सकाळ



**कटफळ (ता. सांगोला) :** येथे जलतारा प्रकल्पाचे भूमिपूजन करताना गटविकास अधिकारी उमेशचंद्र कुलकर्णी, पोलिस निरीक्षक विनोद घुगे व इतर मान्यवर.

# कटफळमध्ये 'जलतारा'चे भूमिपूजन अन् वृक्षारोपण

**महूद, ता. ३ :** पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या मिशन विकसित गाव या कार्यक्रमांतर्गत कटफळ (ता. सांगोला) येथे शनिवारी (ता. ३) जलसंधारणामधील जलतारा या प्रकल्पाचे भूमिपूजन करण्यात आले. तसेच यावेळी मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करण्यात आले.

कटफळ येथील वृक्षारोपणासाठी इंडेक्स कंपनी व मुकुल माधव फाउंडेशन यांच्याकडून विविध प्रकारची दहा फूट उंचीची दोनशे रोपे देण्यात आली होती. सांगोला पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक विनोद घुगे, सांगोला पंचायत समितीचे गटविकास अधिकारी उमेशचंद्र कुलकर्णी, विस्तार अधिकारी श्री. पुकळे, फिनोलेक्स कंपनी व मुकुल माधव फाउंडेशनचे समन्वयक संतोष शेलार यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यानिमित्त कटफळमधील श्री पांडुरंग विद्यालय व जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांनी गावामधून वृक्षदिंडी काढून जनजागृती केली. या कार्यक्रमाचे आयोजन ग्रामपंचायत कटफळ, जय हिंद क्रिकेट क्लब यांच्या वतीने करण्यात आले होते. कार्यक्रमास ग्रामस्थ, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.